# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १७६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Friday 20 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 176 | Pages 4 | Rate 4 Rs


## सातार्‍यात खेळाडूंना मिळणार 'आंतरराष्ट्रीय' बळ

**मुंबई**–केंद्रीय क्रीडा राज्य व युवक कल्याण मंत्री रक्षा खडसे यांनी गुरुवारी सातारा जिल्हा दौऱ्याच्या निमित्ताने भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांची जलमंदिर येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीमध्ये सातारा शहरात अद्ययावत क्रीडा सुविधा व आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा प्रशिक्षक उपलब्ध करण्याच्या दृष्टीने उभयतांमध्ये महत्त्वपूर्ण चर्चा झाली.आंतरराष्ट्रीय दर्जाचे इंडोर बास्केट बॉल स्टेडियम व धनुर्विद्या प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रस्ताव यावेळी खडसे यांना देण्यात आला. सातारा जिल्ह्यामध्ये शिवजयंती विविध उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. सातारा शहरांमध्ये जिल्हा प्रशासनाच्या वतीने मोठ्या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम केंद्र शासनाच्या वतीने पुरस्कृत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने केंद्रीय राज्य व क्रीडातथा युवक कल्याण मंत्री रक्षा खडसे या आवर्जून उपस्थित होत्या.या कार्यक्रमानंतर खडसे यांनी खा उदयनराजे भोसले यांची जलमंदिर येथे सदिच्छा भेट घेतली.

# पुण्यातील किल्ले अतिक्रमणमुक्त ४०० वी शिवजयंती भव्य करू

## शिवनेरीवरून फडणवीसांची घोषणा; अजितदादांचीही आठवण

**पुणे (प्रतिनिधी)–छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवानिमित्त किल्ले शिवनेरी येथे भव्य सोहळा पार पडला. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करत शिवरायांच्या कार्याचा गौरव केला. त्यांनी आपल्या भाषणात इतिहास, स्वराज्याची संकल्पना आणि किल्ल्यांच्या जतनाबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. शिवजन्मभूमीवर बोलताना त्यांनी शिवरायांच्या कार्याचा अभिमान व्यक्त केला आणि भविष्यातील नियोजनाची दिशा मांडली.फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज नसते तर भारताचा इतिहास आणि भूगोल यांचे चित्र वेगळे असते. ज्या काळात अनेक राजे मोघलांच्या अधिपत्याखाली काम करत होते, त्या काळात आई जिजाऊंनी शिवरायांना घडवले. त्यांनी शिवरायांना हिंदुस्थानाला मोघलांच्या जोखडातून मुक्त करण्याची आणि रयतेचे राज्य स्थापन करण्याची प्रेरणा दिली. अठरा पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून उभी केलेली फौज ही स्वराज्याची ताकद ठरली. शिवरायांनी हे राज्य माझे नसून रयतेचे आहे, असे सांगत देव, देश आणि धर्मासाठी लढण्याची शिकवण दिली, असे त्यांनी नमूद केले.**



मुख्यमंत्र्यांनी शिवरायांच्या दूरदृष्टीवरही प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, समुद्रमार्गे शत्रू येऊ शकतो, हे ओळखणारे शिवाजी महाराज हे पहिले राजे होते. त्यामुळे पश्चिम किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी जलदुर्ग उभारण्याचे काम त्यांनी हाती घेतले. पोर्तुगीजांचा पराभव केल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीत कोणत्याही आक्रमकाला समुद्रमार्गे येण्याची हिंमत झाली नाही, असे फडणवीस यांनी सांगितले. शिवरायांचे हे नियोजन आणि धाडस आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.यावेळी त्यांनी ऐतिहासिक किल्ल्यांच्या जतनाबाबत महत्त्वाची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामनिर्देशित करण्यात आले असून जगातील २७ देशांनी त्यास एकमताने मान्यता दिली, याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले. हा सन्मान केवळ महाराष्ट्राचा नव्हे तर संपूर्ण देशाचा गौरव आहे, असे ते म्हणाले. शिवरायांचा वारसा जगासमोर नेण्याचा हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अजित पवार यांचा उल्लेख करत फडणवीस म्हणाले की, अजितदादांना शिवनेरी किल्ल्याबद्दल प्रचंड प्रेम होते. काही काळापूर्वी महाराष्ट्रातील शिवरायांचे सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू असून पुणे जिल्ह्यातील सर्व किल्ले आता अतिक्रमणमुक्त झाले आहेत, असे त्यांनी जाहीर केले. एकाही किल्ल्यावर आता अतिक्रमण नाही, असे सांगताना त्यांनी समाधान व्यक्त केले. हा निर्णय अजितदादांच्या इच्छेनुसार पूर्ण झाल्याचेही त्यांनी नमूद केले.शिवरायांच्या कार्याचा वारसा जपण्याची जबाबदारी आपली आहे, असे सांगत फडणवीस यांनी पुढील नियोजनाची झलकही दिली. २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि दिव्य स्वरूपात साजरी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. त्या निमित्ताने राज्यभर विविध उपक्रम राबवले जातील, असेही त्यांनी सांगितले. शिवनेरीवरून दिलेल्या या घोषणेमुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.शिवजन्मभूमीवर झालेल्या या सोहळ्यात इतिहासाची आठवण आणि भविष्यातील संकल्प यांचा संगम दिसून आला. शिवरायांचे विचार, स्वराज्याची प्रेरणा आणि किल्ल्यांचे संवर्धन यावर भर देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला. शिवनेरीवरून दिलेला हा संदेश केवळ भाषणापुरता मर्यादित न राहता कृतीतूनही दिसेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## अक्कलकुवा-मोलगी रोडवर भीषण अपघात; चालकाचे नियंत्रण सुटल्याने गाडी पुलाच्या कठड्याला धडकली, १२ जण जखमी

दैनिक वादळ वार्ता

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा-मोलगी रस्त्यावरील वालंबा फाट्याजवळ महिंद्रा मॅक्स गाडीला भीषण अपघात झाला असून, या घटनेत एकूण १२ प्रवासी जखमी झाले आहेत. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने गाडी पुलाच्या सिमेंटच्या कठड्याला जोरात धडकल्याने हा अपघात घडला. याप्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, धडगाव तालुक्यातील निगदी वाहणीपाडा येथील रहिवासी असलेले १२ प्रवासी महिंद्रा मॅक्स गाडीने (क्रमांक चक १७ -ग ३९६६) प्रवास करत होते. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास वालंबा गावाच्या फाट्याजवळ असलेल्या शासकीय आश्रमशाळेनजीक गाडी आली असता, अचानक चालकाचा




ताबा सुटला. वेगात असलेली गाडी थेट पुलाच्या कठड्यावर आदळली.

धडक इतकी जोरात होती की गाडीचे मोठे नुकसान झाले असून त्यातील प्रवासी जखमी झाले आहेत. या अपघातात फिर्यादी प्रताप इंद्या वळवी (वय ३६) यांच्यासह मिनाबाई पाडवी, बाशा पावरा, ज्योती वळवी, निशा पाडवी, योगेश वळवी, अनिता पाडवी, बोल्या तडवी, अमोल पावरा, शेवंतीबाई पावरा, सुनील पवार आणि विरसिंग पवार हे जखमी झाले आहेत.याप्रकरणी फिर्यादी प्रताप वळवी यांच्या तक्रारीवरून चालक दिलीप ठोग्या पावरा याच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब), ३२४(४) आणि मोटार वाहन कायद्याच्या कलम १८४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस हेड कॉन्स्टेबल अरुण देवीदास सूर्यवंशी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, निष्काळजीपणे वाहन चालवल्यामुळे प्रवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याने चालकावर कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांची पिंपराळा ग्रामस्थ मंडळी तर्फे जयंती मोठ्या उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**वसमत । प्रतिनिधी**

पिंपराळा: येथील ग्रामस्थ यांनी विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक श्री संत ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडल यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वराज्यनिष्ठा, उत्तम प्रशासन व राष्ट्रभक्तीवर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी भाषणे, पोवाडे व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या प्रसंगी मान्यवरांनी महाराजांच्या विचारांचा अंगीकार करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. जयंतीनिमित्त गावात



शिवाजी महाराज यांच्या पालखी व दिंडी काढून गावामध्ये प्रदक्षणाकाढण्यात आली. कार्यक्रमास नागरिक, विद्यार्थी, व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केज शहरात शिवजयंतीचा जल्लोष ढोल-ताशांच्या गजरात आणि शिस्तबद्ध मिरवणुकीने शिवरायांना मानवंदना!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

सह्याद्रीच्या कड्या कपाऱ्यांत घुमणारा जय भवानी,जय शिवाजी चा जयघोष आज केज शहराच्याकानाकोपऱ्यात घुमला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त केज शहरात अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. पारंपारिक वाद्ये,लेझीम पथके आणि महिलांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण केज शहर शिवमय झाले होते.

**ठळक वैशिष्ट्ये:डीजेला फाटा, संस्कृतीला मान**

यंदाच्या मिरवणुकीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे शिवप्रेमींनी डॉल्बीच्या कर्कश आवाजाला फाटा देऊन स्वतःहून बंदी घातली होती.त्याऐवजी ढोल -ताशा आणि वासुदेव पथकांच्या गजराने शहरात एक वेगळेच नवचैतन्य पसरले होते. रणरागिणींचा सहभाग: डोक्यावर भगवे फेटे बांधून महिलांनी मोठ्या संख्येने फेरीत सहभाग घेतला.महिलांच्या या शिस्तबद्ध सहभागाने मिरवणुकीची शोभा वाढवली.

**रोषणाईचा झगमगाट**



केज शहरातील मुख्य छत्रपती शिवाजी महाराज चौक विविध रंगीबेरंगी रोषणाईने उजळून निघाला होता. हा परिसर पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

**शिस्तबद्ध नियोजन आणि पोलीस बंदोबस्त**

मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी शिवप्रेमीं कडून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या आणि फराळाचे वाटप करण्यात आले.अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि शांततेत ही मिरवणूक पार पडली.अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली केज पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.विविध सार्वजनिक मंडळांनी सादर केलेले जिवंत देखावे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी यंदाच्या शिवजयंती उत्सवात एक वेगळीच रंगत भरली.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडशेत वस्ती शाळा उमरी केंद्र टाकळी शिवजयंती उत्साहात साजरी

### जिल्हा परिषद शाळा वाचल्या पाहिजेत-प्रा.डा.नवनाथ काशिद

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडशेत वस्तीशाळा उमरी केंद्र टाकळी शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तर शाळांनी घेतलेल्या उपक्रमाला सुद्धा सर्वांनी सहकार्य करायलापाहिजे असे माझे प्रामाणिक मत आहे असे प्रा.डा.नवनाथ काशिद सर यांनी सांगितले.शिवजयंती अनुषंगाने विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.छत्रपती शिवरायांचा इतिहास याविषयी श्री.फुलचंद घुले मुख्याध्यापक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वड शेत वस्ती तालुका केज यांनी विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.यानंतर शिवजयंती निमित्त स्वागतगीत,शिव जन्मोत्सवाचा पाळणा, शिवरायांच्या गुणगौरवा आधारित गीतावर विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य, पोवाडा सादरीकरण केले या कार्यक्रमास वड शेत वस्ती येथील ग्रामस्थ श्री.विश्वनाथ मुळे,श्री. दिगंबर मुळे,श्री.गणेश भैरट,श्री.आकाश भैरट, श्री.रामेश्वर मुळे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.चंद्रशेखर मुळे,श्री.अशोक मुळे,श्री. नाना भैरट,श्री.विनायक मुळे,श्री.भगवान मुळे, श्री.हरिभाऊ मुळे,श्री. आश्रुबा मुळे,श्री.भोसले सर व अनेक माता पालक यांनी हजर राहून विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक व अभिनंदन केले शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती सुवर्णा जगदाळे सह शिक्षिका जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वडशेत वस्ती उमरी यांनी केले.



## जि.प.शाळा वाचविण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशना मध्ये प्रश्न उपस्थित करण्याचे आ.अंतापुरकर यांचे आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदेच्या नगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेंच्या शाळामध्ये भौतिक सुविधाची आणि शिक्षकांची कमतरता तसेच भरमसाठ अशैक्षणिक कामे यामुळे या शाळेमध्ये विद्यार्थी संख्या कमी होत असून त्या बंद होण्याच्या मार्गावर आलेले आहेत आणि ह्या शाळा जर बंद झाल्या तर गोरगरिबांना शिक्षण मिळणे दुरापास्त होऊन जाईल म्हणून ह्या शाळा वाचविण्यासाठी प्रा डॉ.शंकर गड्डमवार व त्यांच्या सहकारी मित्रांनी आ जितेशराव अंतापुरकर यांना निवेदन देऊन जिल्हा परिषदेसह सरकारी शाळा व मराठी माध्यमाच्या शाळा वाचल्या पाहिजेत यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ अधिवेशनामध्ये मुद्दा उपस्थित करून सरकारच्या नजरेमध्ये आणून द्यावे व तात्काळ योग्य ती अंमलबजावणी करण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे. यावेळी माझ्या देगलूर बिलोली मतदारसंघांमध्ये सर्व भौतिक सुविधा पुरवून पायलट प्रोजेक्ट म्हणून शाळा सुरू करण्याचे आश्वासन देखील त्यांनी दिले.

## देगाव येथील पु.साने गुरुजी विद्यामंदिर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

# स्वतःच्या नावासह शाळेचे नाव उज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । प्रतिनिधी**

पुज्य साने गुरुजी विद्यामंदिर देगाव येथे मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा सेंडऑफ निरोप समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संचालक तथा शालेय समिती अध्यक्ष रावसाहेब पाटील मोरे हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेच्या सहसचिव श्रीमती जयमाला पटने मॅडम, तसेच शिक्षण विस्तार अधिकारी उद्धव ढगे कुंटुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विशाल भोसले मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक शंकरराव धनाजी मोरे,शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ. गोदावरीताई इबिते, जि.प. कन्या शाळेचे मुख्याध्यापक आनंद रेनगुंटवार जयराम आंबेकर विद्यालय अर्जापुरचे मुख्याध्यापक सुभाष देगलुरकर



यांची आवर्जून उपस्थिती लाभली. तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून सेवानिवृत्त शिक्षक उमाकांत धुळेकर देगाव नगरीचे माजी सरपंच नामदेवराव चिंचलवाड,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. अशोक कुमनाळे,कोषाध्यक्ष गोविंदराव उपासे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती सुनिताताई मुंगडे यांनी सुंदर व प्रभावीपणे केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण कोंडावार यांनी केले.आजपर्यंतचा शाळेचा प्रवास,शाळेच्या विकासासाठी लागलेले अनेकांचे योगदान याविषयी माहिती दिली कै.गंगाधरराव पटणे यांनी शाळेच्या लावलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रुपांतर झाले असून आज पटणे साहेबांची उणीव भासत असल्याचा आवर्जून त्यांनी उल्लेख केला.

कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे शाळेचे माजी विद्यार्थी शंकर धनाजी मोरे (पोलीस उपनिरीक्षक,मुक्रमाबाद) यांचा शाळेतर्फे मानचिन्ह देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. एका सामान्य कुटुंबातून शिक्षण घेऊन जिद्दीच्या बळावर यश संपादन केलेल्या त्यांच्या कार्याचा गौरविण्यात आले

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ढगे, विशाल भोसले श्रीमती जयमाला पटने मॅडम, आनंद रेनगुंटवार, सुभाष देगलुरकर, उमाकांत धुळेकर प्रा.अशोक कुमनाळे तसेच सौ. गोदावरीताई इबिते यांनी विद्यार्थ्यांना परिश्रम, शिस्त, सातत्य आणि आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले.मोठी स्वप्ने पाहा आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, असा संदेश त्यांनी दिला. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला डायस भेट देऊन कृतज्ञता व्यक्त केली. हा क्षण उपस्थितांसाठी अत्यंत भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाचा समारोप अध्यक्षीय भाषणातून रावसाहेब मोरे यांनी केला.त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढील वाटचाल करण्याचे आवाहन केले शाळेच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे प्रतिपादन केले.तर शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परिसरामुळे हा समारंभ पार पडला आहे.

## अनेकदा मुदतवाढ:-शासकीय वाहनांवर नवी नंबर प्लेट नाही; 'एचएस आरपी' चा विसर!

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**




देगलूर राज्य सरकारने हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची सक्ती लागू करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक त्रुटी समोर येत आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदतवाढ देऊनही हजारो वाहने अद्याप नोंदणी विना असल्याचे चित्र दिसत आहे. शहरातील एकूण नोंदणी पाहता असंख्य वाहने नोंदणीकृत आहेत. एचएसआरपी नंबर प्लेट बसवण्यात आलेली वाहने देखील लक्षणीय आहे, मात्र धक्कादायक बाब म्हणजे काही शासकीय वाहनांवर ही अद्याप एचएसआरपी बसविण्यात आली नाही वाहण्याची सुरक्षा वाढवणे, चोरी व गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे, आणि वाहण्याची अचूक ओळख सुनिश्चित करणे हा एचएसआरपीचा मुख्य उद्देश असल्याचे शासनाने सांगितले होते. एचएसआरपी प्लेटच्या दर्जाबाबत वाढत्या तक्रारी, कारवाई अभाव आणि शासनाची मौन भूमिका यामुळे योजनेवरच संशयाची छाया निर्माण झाली आहे.

महिना उलटूनही ठोस कारवाई नाही...

एचएसआरपी बसविण्यासाठी ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत निश्चित केली होती. ही मुदत संपून आता तब्बल एक महिना उलटूनही ना कोणती ठोस कारवाई जाहीर करण्यात आली आहे. ना मुदतवाढीचा अधिकृत निर्णय. परिणामी, वाहनधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण पसरले आहे. सक्तीचा आदेश, ऑनलाईन नोंदणी आणि शुल्क आकारणी सुरू असताना मुदत संपल्यानंतरही हजारो वाहने आजही एचएसआरपी विना रस्त्यावर धावत असल्याचे वास्तव आहे.

भूमिका जाहीर करण्याची होतेय मागणी

वेळेत नोंदणी शुल्क भरून एचएसआरपी बसविणाऱ्या वाहनधारकांनाच आता निकृष्ट दर्जाच्या प्लेट्सचा सामना करावा लागत असल्याने त्याचा संताप वाढत आहे. परिवहन विभागाने या प्लेट्सच्या दर्जाची तातडीने चौकशी करावी. खराब प्लेट्स बदलून देण्याची व्यवस्था करावी. तसेच मुदत संपल्यानंतरही एचएसआरपीविना धावणाऱ्या वाहनांबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी.अशी जोरदार मागणी होत आहे.

## पंधरा हजार बनावट जन्म नोंदी करणाऱ्या त्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश; झारखंडमधील ५ आरोपी जेरबंद

**दैनिक वादळ वार्ता**
**नांदेड । प्रतिनिधी**



नांदेड: शासकीय पोर्टलचा गैरवापर करून हजारो बनावट जन्म नोंदी करणाऱ्या आंतरराज्य टोळीचा उस्माननगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी तपास पथकाने थेट झारखंड राज्यात जाऊन पाच आरोपींना अटक केली असून, त्यांना पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे.

सावळेश्वर (ता. कंधार) येथील ग्रामपंचायत अधिकारी भावना माधवराव कावळे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली होती. महाराष्ट्र शासनाच्या उठड (Civil Registration System) पोर्टलचा युजर आयडी (MH20362RE) फिर्यादीच्या ताब्यात असताना, अज्ञात व्यक्तींनी त्याचा बेकायदेशीर वापर केला. या आयडीद्वारे तब्बल १५ हजार ५६९ बनावट जन्म नोंदी करून शासनाची मोठी फसवणूक करण्यात आली होती. हा प्रकार १ मे २०२५ ते ३० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत घडला.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उस्माननगर पोलीस आणि सायबर सेल, नांदेड यांनी या गुन्ह्याचा तांत्रिक तपास केला. तपासाची चक्रे फिरवत पोलीस पथकाने झारखंड राज्यातील रांची आणि गढवा जिल्ह्यातून पाच जणांना ताब्यात घेतले. यात जितेंद्र कुमार सिंह (वय ५२ वर्षे) व्यवसाय- बिल्डर, रा. गढवा, ओम प्रकाश मिश्रा (३३) इंटरनेट सेंटर चालक, रा. रांची, लक्ष्मी पंडित (३४) खाजगी नोकरी, रा. रांची., सुमीत कुमार सिंह (२७) उडउ सेंटर चालक, रा. रांची व सतिश कुमार (३५) CSC सेंटर चालक, रा. रांची, यांचा समावेश आहे.सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस निरीक्षक एन. एस. आयलाने, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, उपनिरीक्षक सुनील सूर्यवंशी व इतर अंमलदारांचा समावेश होता.सध्या सर्व आरोपी पोलीस कोठडीत असून, या रॅकेटमध्ये अजून कोणाचे हात गुंतले आहेत का, याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक एन. एस. आयलाने करत आहेत

## भाजपा हदगाव तालुक्याच्या वतीने काँग्रेस प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांचा निषेध

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

दिनांक १८ फेब्रुवारी बुधवार रोजी हदगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,तामसा टी पॉईन्ट येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना करून त्यांना समकक्ष ठरवण्याचा जो दुर्दैवी व आक्षेपार्ह प्रकार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी केला ते केवळ ऐतिहासिक अज्ञानच नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेवर थेट घाला आहे.छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीने धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणं म्हणजे इतिहासाचा अपमान आहे.काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी केलेल्या या विधानाबद्दल संपूर्ण महाराष्ट्रातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. त्यांच्या विधानाबद्दल केवळ माफी नव्हे, तर काँग्रेस पक्षाने त्यांच्यावर तात्काळ कारवाई करून बडतर्फ करावं.याकरिता निषेध करण्यात आला त्याप्रंसगी भाजपा शहरमंडळ अध्यक्ष बाळा पाटील, पश्चिम मंडळाध्यक्ष सूर्यकांत हानवते, भाजपा ज्येष्ठ नेते चंद्रशेखर कदम, भटक्या विमुक्त जाती अध्यक्ष प्रकाश राठोड, माझी जिल्हा उपाध्यक्ष भारतीताई कराळे, डॉक्टर दीपक नाईक, शहराध्यक्ष शिवराज वरकड, महेश मठपती, नगरसेवक प्रतिनीधी साई बाभुळकर, सचिन तांदळे, किसन कांबळे, गणेश हामरे,दिलीप बल्लाळ, आध्यात्मिक आघाडी अध्यक्ष गिरी महाराज, बापूसाहेब देशमुख,डोरले सर, पूर्व मंडळ सरचिटणीस अवधूत कदम, एडवोकेट नंदकुमार वाडकर, शहर मंडळ चिटणीस गोविंद कळसे, प्रदीप देशमुख यादवराव देशमुख, सुधाकर तावडे, शेषराव मुलगीर, विठ्ठल राव मस्के, अवधूत कोंडेकर, उत्तमराव एकलारे, भगवान खांजोडे,विजय डुरके व भाजपा प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## माणिकगड (अल्ट्राटेक) सिमेंट वर्क्स विरुद्ध गडचांदूरकरांचा एल्गार; 'आम्हाला जगण्याचा अधिकार आहे की नाही?' नागरिकांचा थेट सवाल!



**दैनिक वादळ वार्ता**
**चंद्रपूर । सिध्देश्वर केंद्रे**

UltraTech Cement अंतर्गत माणिकगड सिमेंट प्रकल्पामुळे वाढत्या प्रदूषणाच्या समस्येने त्रस्त झालेल्या नागरिकांचा संताप पुन्हा एकदा उफाळून आला आहे. शहरात आणल्या जाणाऱ्या कचऱ्याच्या वाहनाला नागरिकांनी दुसऱ्यांदा अडवत जोरदार निषेध नोंदविला.सांगा साहेब, आम्हाला जगण्याचा अधिकार आहे की नाही? असा ज्वलंत प्रश्न उपस्थित करत नागरिकांनी कंपनीच्या कथित अरेरावीविरोधात आवाज उठविला. धूळ, दुर्गंधी व आरोग्याच्या तक्रारींमुळे परिसरातील नागरिक संतप्त झाले असून ठोस कारवाईची मागणी करण्यात येत आहे.आंदोलनादरम्यान काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. प्रशासनाने मध्यस्थी करत चर्चा केली असली तरी, ठोस उपाययोजना न झाल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक त्रास,

### एक जिल्हा-एक नोंदणी ला किनवटमध्ये हरताळ

**दैनिक वादळ वार्ता**
**किनवट । प्रतिनिधी**




राज्य शासनाच्या 'एक जिल्हा – एक नोंदणी' या उपक्रमाची अंमलबजावणी किनवट येथील दुय्यम निबंधक कार्यालयात प्रभावीपणे होत नसल्याचे चित्र समोर आले आहे. शासनाने दिलेल्या कार्यालयाबाहेर निर्देशानुसार 'सहदुय्यम निबंधक कार्यालय' असा फलक लावणे बंधनकारक आहे. मात्र, आदेशाला जवळपास वर्ष उलटून गेले तरीही संबंधित फलक बदलण्यात आलेला नाही. यामुळे नोंदणीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत असून, योग्य कक्ष व प्रक्रियेबाबत त्यांची गैरसोय होत असल्याची तक्रार आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे.

योजनेची प्रभावी अंमलबजावणी नाही

दरम्यान या कार्यालयातील कथित गैरकारभाराबाबत काही नागरिकांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. या तक्रारींची दखल घेत नांदेड येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी अचानक किनवट कार्यालयाला भेट दिली. त्यांनी कार्यालयीन कामकाजाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांची प्राथमिक चौकशी केली. सूत्रांच्या माहितीनुसार, प्राप्त तक्रारींवर स्पष्टीकरण देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना नांदेड येथे हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, या चौकशीनंतर पुढे काय ? हा प्रश्नाचे उत्तर तूर्त अनुत्तरीत आहे.

स्थानिक नागरिकांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करून शासन आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच कार्यालयातील कामकाज पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने चालवावे, अशी मागणी केली आहे. आता वरिष्ठ प्रशासन या प्रकरणात नेमकी काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## महापुरुषांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा डोक्यात घ्या-दंगलकार

**दैनिक वादळ वार्ता**
**भूम । प्रतिनिधी**



शिव फुले भीम महोत्सव आयोजित संत रोहिदास महाराज छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या संयुक्त जयंतीच्या अनुषंगाने नगरपालिका मैदानावर बहुजन नायक ग्रुप व एन डी एम जे संघटनेच्या वतीने दंगल कार नितीन चंदनशिवे यांचा जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन व्याख्याते नितीन चंदनशिवे नगरसेवक चंद्रमणी गायकवाड प्रा राम चंदनशिवे दत्तात्रय पाटोळे अँड अमृता गाढवे यांच्या हस्ते केले.

तसेच बहुजन नायक ग्रुप व एन डी एम जे संघटना च्या वतीने नितिन चंदनशिवे, संदीप बागडे व बखतार काझी यांना बहुजन रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

पुढे बोलताना चंदनशिव म्हणाले छत्रपती शिवाजी महाराजांनी अमावस्याच्या दिवशी लढाया केल्या आणि जिंकल्या लढाईला जात असताना कधीही महाराजांनी मुहूर्त पाहिले नाही संत गाडगेबाबा माणसातले संत होते. गाडगे बाबा हे मानवतावादी संत होते. चर्मकार बांधवांनी संत रोहिदास महाराजांचा विचार अभ्यास करून आत्मसात करावा अशी आव्हान चंदनशिवे यांनी केले.

मी चळवळीचा किडा आहे माझ्या अंगामध्ये विलास वाघमारे सारख्या चळवळीतल्या कार्यकर्त्यांचा किडा माझ्या अंगात शिरल्याने मी कधीही जास्त मानधनावर व्याख्यान देत नाही कमीत कमी मानधनावर मी व्याख्यान करतो आणि समाज प्रबोधन कवितेच्या माध्यमातून करतो. जात धर्म पंथ सोडून द्या जातीला आपल्या मधून हद्दपार करा आणि मी भारतीय आहे.म्हणून महापुरुषांना डोक्यावर घेऊन नाचण्यापेक्षा डोक्यात घ्या असे उपस्थित समाज बांधवांना संबोधित केले.

याप्रसंगी एन डी एम जे संघटनेचे जिल्हाध्यक्ष अजिनाथ राऊत बहुजन नायक ग्रुप चे अँड आर आर सुकाळे रविंद्र लोमटे रूषी लोंखडे परेश शिंदे राजाराम गवळी सारीपुत्त भोसले अप्पासाहेब थोरात अरविंद गायकवाड तानाजी सोनवणे आदीने परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार अँड आर आर सुकाळे यांनी केले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त वक्तृत्वस्पर्धा संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची शाळेत छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या जयंती निमित्त दि.१८ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी राजमुद्रा विकास मंच कुंबेफळ ता.केज यांनी वक्तुत्व स्पर्धा आयोजित केल्या. यावेळी प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.या कार्यक्रमात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेतील इ.पहिली ते सातवी व सिध्दीविनायक विद्यालय कुंबेफळ या शाळेतील इयत्ता पाचवी वी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या स्पर्धे साठी इयत्ता पहिली ते चौथी,पाचवी ते सातवी व आठवी ते




दहावी असे गट होते.मान्यवरांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कुंबेफळ ग्रामपंचायतचे सरपंच श्री.अविनाश दिनकर पांचाळ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.शालु विजय थोरात,प्रमुख पाहुणे डॉ. सौ.योगिनी ताई थोरात माजी जिल्हा परिषद सदस्या,उद्घाटक,श्री. सुरेश नाना थोरात, प्रकाश थोरात बंडु आबा शिक्षणप्रेमी नागरिक, मार्गदर्शक विष्णु आबा थोरात,किशोर तात्या थोरात,माजी सरपंच हे होते व या कार्यक्रमास उत्तेजन श्री.पांडुरंग थोरात लेखाधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी दिले.या स्पर्धेचे प्रथम, द्वितीय,तृतीय व प्रोत्साहनपर असे विजयी स्पर्धकांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास आपण छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या विचारांचा आपण आदर्श घेऊन आपण आपल्या जीवनात यशस्वी होणेसाठी सर्वांनी मेहनत घेतली पाहिजे.असे आपल्या प्रास्ताविकात डॉ.सौ. योगिनीताई थोरात माजी जिल्हा परिषद सदस्या यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेतील इयत्ता सहावी तील विद्यार्थीनीकु.वैभवी दत्तात्रय घाडगे या विद्यार्थिनीने केले.शेवटी या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री.डॉ. रामकिशन ग्यानबा मुळे सर यांनी आभार मानले.

## केकतसारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती पारंपरिक पद्धतीने साजरी,रमेशराव आडसकर यांच्या हस्ते पुजन

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील केकत सारणी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती यंदा अत्यंत पारंपारिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. गावकऱ्यांनी एकत्र येत कोणत्याही प्रकारचा कर्कश आवाज करणारा डॉल्बी न लावता ढोल- ताशे,लेझीम,टिपरे आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढून एक आदर्श निर्माण केला

सकाळी लवकर ग्रामस्थांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन रमेशराव आडसकर यांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.त्यानंतर सजवलेल्या बैलगाडीतून महाराजांची प्रतिमा ठेवून गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक पोशाख परिधान केलेले युवक, लेझीम खेळणाऱ्या महिला व



मुली,तसेच शिवकालीन वेशभूषेत सहभागी झालेले लहान मुले हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरले. जय भवानी,जय शिवाजी च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. यावेळी आंबा साखर कारखान्याचे चेअरमन श्री.रमेशरावजी आडकर साहेब व ऋषीकेश भैया आडसकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यांनी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेतील कार्याचा उल्लेख करून युवकांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घ्यावा असे आवाहन केले.सामाजिक ऐक्य, शिस्त आणि पर्यावरण पूरक सण साजरा करण्याचा संदेश त्यांनी दिला.कार्यक्रमात गावातील सर्व लहान मुले,महिला,पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.तरुणांनी नियोजन, शिस्त व व्यवस्थापनाची जबाबदारी पार पाडत जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.विशेष म्हणजे,ध्वनीप्रदूषण टाळत पारंपरिक पद्धतीने सण साजरा करण्याचा घेतलेला निर्णय सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरला.

संपूर्ण गावाने एकजुटीने आणि उत्साहाने जयंती साजरी करून समाजा पुढे एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला. केकतसारणी येथील ग्रामस्थांनी परंपरा जपत सुसंस्कृत आणिपर्यावरण पूरक पद्धतीने जयंती साजरी करून खऱ्या अर्थाने शिवरायांच्या विचारांना अभिवादन केले.यावेळी पंडितराव सावंत,बालासाहेब सपकाळ,बापुराव फुके, चंद्रकांत कोरडे,शरद गिराम यांच्या सह गावातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भगवान बाबा विद्यालय केकत जळगाव;दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**दैनिक वादळ वार्ता**
**पाचोड । प्रतिनिधी**

भगवान बाबा माध्यमिक विद्यालय केकत जळगाव येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे शिक्षक श्री जाधव सर तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवछत्रपती कॉम्प्युटरचे एखंडे सर हे होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुमारी भारती बडे व वैष्णवी वाघ यांनी केले विद्यार्थी व विद्यार्थिनी आपापले मनोगत व्यक्त केले.आणि शाळेतील विविध अनुभव व्यक्त केले कुमारी तनुजा बडे गणेश नागरगोजे संकेत थोरे उत्कर्ष केकण सोनाली वाघमारे वैष्णवी केकान या विद्यार्थ्यांनी शाळेतील विविध अनुभव आणि शाळेबद्दल चा आठवणींना उजाळा करून दिला. सव्वाशे, जाधव, सोनवणे, बोबडे, टोपे,थोरे यांनी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले प्रमुख पाहुणे म्हणून एखंडे सर यांनी करिअर मार्गदर्शन आणि भविष्यातील येणाऱ्या समस्याला सामोरे जाण्यासाठी महत्त्वाचे मार्गदर्शन केले कावेरी मगर हिने आभार मानले.

## पाराशर महाराज मंदिर परिसरात सेवाभावातून ग्राउंड उभारणी ग्रामस्थांसाठी नवी सुविधा

**दैनिक वादळ वार्ता**
**भोकरदन । राम शिंदे**

गावाचे श्रद्धास्थान असलेल्या पारेश्वर महाराज मंदिर परिसरात सामाजिक व धार्मिक उपक्रमांना चालना देणारी एक महत्त्वपूर्ण सुविधा उभी राहिली आहे. पाराशर महाराज संस्थानच्या पुढाकारातून मंदिर परिसरातील ग्राउंडवर मुरूम टाकून दबाई व समतलीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून, यामुळे परिसराला सुबक आणि प्रशस्त मैदानाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.या कामासाठी प्रतीक भास्करराव दानवे यांचे कव्हरेज इन्फ्रास्ट्रक्चर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या माध्यमातून दबाई मशीन व लेव्हल करणारी यंत्रसामग्री निशुल्क उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे काम जलद, अचूक आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण होऊ शकले.संस्थानचे सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक समाधान लोखंडे यांनी या उपक्रमासाठी विशेष लक्ष देत प्रत्यक्ष उपस्थित राहून नियोजन व अंमलबजावणीची जबाबदारी सांभाळली. त्यांच्या समन्वयामुळे सर्व काम सुरळीतपणे पार पडले आणि ग्राउंड व्यवस्थित तयार झाले.या नव्या मैदानामुळे मंदिरावर होणारे लग्नसोहळे, धार्मिक कार्यक्रम आणि सामाजिक समारंभ अधिक भव्य पद्धतीने पार पडणार आहेत. तसेच गावातील मुले व युवकांसाठी खेळण्याची उत्तम सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## केज येथील चाईल्ड प्रायमरी स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केजशहरातील नामांकित शैक्षणिक संस्था चाईल्ड प्रायमरी स्कूल,केज येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरी करण्यात आली.शाळेच्या प्रांगणात शिवप्रतिमेचे पूजन करूनकार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यार्थी,शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक शरद गिराम सर हे होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून आदर्श शासन प्रणाली उभी केली. त्यांच्या शौर्य,दूरदृष्टी, शिस्त आणि संघटन कौशल्याचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. शिवाजी महाराजांचे जीवन हे केवळ इतिहास नसून ते प्रेरणादायी मार्गदर्शक आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने प्रामाणिक पणा,धैर्य आणि देशभक्ती ही मूल्ये आपल्या जीवनात रुजवावीत, असे त्यांनी सांगितले.तसेच शिक्षणा सोबतच संस्कारांचे महत्त्व ही अधोरेखित केले.शाळेच्या सचिव पूजा गिराम यांनी प्रास्ताविक करताना शिवाजी महाराजांच्या बालपणापासून ते स्वराज्य स्थापनेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला.जिजाऊंच्या संस्कारांमुळेच शिवराय घडले,असे नमूद करत त्यांनी पालकांनीही मुलांमध्ये चांगले संस्कार रुजवावेत,असे आवाहन केले.शिवाजी महाराजांच्या प्रशासन कौशल्य,स्त्रीसन्मान व धर्मनिरपेक्षतेच्या विचारांचा




उल्लेख करून त्यांनी विद्यार्थ्यांना इतिहासातून प्रेरणा घेण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साखरे सर यांनी प्रभावीपणे केले.त्यांनी शिवजयंतीचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करत विविध कार्यक्रमांची माहिती प्रेक्षकांना दिली. विद्यार्थ्यांच्या सादरी करणांना जोड देत त्यांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण केला.यावेळी विद्यार्थ्यांनी शिवकालीन वेशभूषा परिधान करून आकर्षक सादरीकरण केले.काही विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज,जिजाऊ, मावळे यांची वेशभूषा साकारली होती. विद्यार्थ्यांनी शिवचरित्रा वर आधारित भाषणे सादर केली तसेच देशभक्तीपर गीतांनी वातावरण भारावून गेले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तपसे,पुरी, राऊत,मुसळे,चटप व भंडारे या शिक्षक व कर्मचारी वर्गाने विशेष परिश्रम घेतले.शेवटी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.या उत्साहपूर्ण कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासा बद्दल अभिमान व प्रेरणा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/२/२०२६
हिषानामा व सिटी स. नक्कल अधारे
अर्जदाराचे नाव :- १) इमाद सफदर फारोकी २) जवाद सफदर फारोकी
यांना श्री गौस मोहियोद्दीन तमिजोद्दीन फारोकी यांचे कडुन खालील चतु :सिमेच्या आतील
खुला प्लॉट नं. सिटी स.न.२१३८/२ पैकी
वार्ड क्रं ४ विभाग-उमरी रोड
भाग नं.१ पू.प २० फूट द.उ.५४
भाग नं.२ पू.प.२० द.उ.५४ फूट
चतु:सिमा
पुर्व : अखतर जफर फारोकी
पश्चिम : रस्ता
दक्षिण : हबीब जमील फारोकी
उत्तर : रस्ता
पुर्व : खिजर जफर फारोकी
पश्चिम : रस्ता
दक्षिण : रस्ता
उत्तर : फारोकी माजीद
१) हिषानामा क्र. ४९१६ दि.१४ /९/२०१५ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.
२) हिषानामा क्र.४९२५ दि.१४/९/२०१५ अधारे

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/०२/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- जयश्री नवनाथ नेहरकर
यांना श्री.अंबादास माधव सत्वधर रा. केज यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
स.न.११९
वार्ड क्रं २ विभाग-धारूर रोड
चतु:सिमा
पुर्व :केज-धारूर रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ सी
पश्चिम :अंबादास माधव
दक्षिण : अंबादास माधव
उत्तर : थोरात
लांबी : पू.प.१०० फूट
रुंदी : द.उ.३० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.२१३८ दि.४/११/२०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/०२/२०२६
खरेदी खता अधारे
अर्जदाराचे नाव :- पुनम प्रेषित चाटे
रा. केज यांना श्री. अरुण पंडित साळुंके
रा. केज यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
घर नंबर :२७८६/७
खुला प्लॉट नं. -
वार्ड क्रं ११ विभाग- अंबाजोगाई रोड
चतु:सिमा
पुर्व : विलास बन्सी डोईफोडे
पश्चिम : सुनिता हनुमंत मुळे
दक्षिण : विलास बन्सी डोईफोडे
उत्तर : बीड-परळी राज्य महामार्ग
लांबी : द.उ. ४० फूट
रुंदी : पू.प. २० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. ४०१ दि. ०९/०२/२०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/२/२०२६
खरेदी खत अधारे
अर्जदाराचे नाव :- सुरेखा रघुनाथ शिंदे
रा.केज यांना श्री. हाजी मौला सालमसाहब सौदागर
रा. केज यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
घर नंबर -----
खुला प्लॉट नं------ सर्वे .न. ७९
वार्ड क्रं ५ विभाग- उमरी रोड
चतु:सिमा
पुर्व : प्लॉट क्रं.५९
पश्चिम :२० फुट रुंदीचा रस्ता
दक्षिण : हाजी मौला सालमसाहब सौदागर यांची शिल्लक जागा
उत्तर : रस्ता
लांबी :पू.प.१२.१९ मि रुंदी : द.उ.११.५८ मि.
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.३५९१ दि.८/८/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/२/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव :- संजय नवनाथ नेहरकर
रा.केज यांना यांना श्री.मंगल किसन सत्वधर (लग्नपूर्वीचे नाव )
मंगल गोविंद सोनके (लग्ना नंतरचे नाव )
रा. केज
यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर_ सर्वे.न. २१२/६
वार्ड क्रं २ विभाग- धारूर रोड
चर्तु:सिमा
पुर्व : मधुकर पंढरी नेहरकर
पश्चिम : शेख बशीर शेख सय्यद
दक्षिण : गोविंद नवनाथ नेहरकर
उत्तर : सुमित्रा राजेंद्र जाधव
लांबी : पु.प. ३३ फुट रुंदी : द.उ. ३३ फुट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं. १२१ दि.९/१/२०२६ आहे.अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/२/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव :- १) चंद्रकला रमेश निंगुळे २) मनीषा कृष्णा निंगुळे
रा.केज यांना श्री. अनिल आश्रुबा निंगुळे रा. केज यांचे कडुन खालील चतु : सिमेच्या आतील
घर नंबर ५४४९
खुला प्लॉट नं.१०२
वार्ड क्रं.४ विभाग- वसंत विद्यालय च्या मागे
चर्तु:सिमा
पुर्व :अनंता रामभाऊ गायेक
पश्चिम :गाडवे रामभाऊ
दक्षिण : १५ फुट रुंदीचा रस्ता
उत्तर : रोडे येडबा गणपती
लांबी : पू.प. ४५ फूट रुंदी : द.उ. ४० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.२९४५ दि.१९/८/ २०२५ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

### प्रसिद्धी पत्रक
**नगर पंचायत कार्यालय**
**केज, ता.केज जि. बीड.**

दि .१८/२/२०२६
खरेदी खत आधारे
अर्जदाराचे नाव :- धिरज विष्णु कोमटवार
रा. धारूर यांना श्री.१) बायसकु मारोती सोनवणे २) अर्जुन वानबा वाघमारे रा . केज यांचे कडुन खालील
चतु : सिमेच्या आतील
घर नंबर १८६७/१
खुला प्लॉट नं------
वार्ड क्रं . १० विभाग- मेन रोड ( बस स्टॅंड जवळ )
चतु:सिमा
पुर्व : ४ फुट रस्ता व गाढवे यांचे घर
पश्चिम : रोडे यांची जागा
दक्षिण : शेषेराव नामदेव घुंडरे यांची जागा
उत्तर : १५ फुटाचा रस्ता
लांबी : पू.प. ३० फूट रुंदी : द.उ. ५० फूट
खरेदी केला असुन खरेदी खताचा दस्तऐवज नं.५८६ दि.२३/१/ २०२६ आहे. अर्जदाराने नोंदणी करून नोंदणी नक्कल_ मागीतली आहे. करिता उजर आसल्यास हे प्रसिद्धी पत्रक झाल्याच्या तारखेपासून ( ७ ) दिवसाच्या आत पुराव्यासाहित असल्यास या कार्यालयात दाखल करावे . नसता रितसर अर्जदाराच्या जागेची नोंदणी करून नोंदणी नक्कल दिली जाईल.याची नोंद घ्यावी.

**नगरपंचायत कार्यालय ,केज**

# महापुरुषांनी सांगितलेले विचार आम्ही आमच्या जगण्यात उतरवले पाहिजेत-प्रसिद्ध व्याख्याते प्रा.बापुसाहेब शिंदे

## 'तुलसी समूहात' व्याख्यान, रक्तदान शिबिर आणि विविध उपक्रमांनी शिवजयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आजच्या काळात आपण महापुरुषांचा जयजयकार करतो, त्यांना डोक्यावर घेतो, पण त्यांचे विचार डोक्यात घेत नाही. जोपर्यंत महापुरुषांचे विचार आपल्या आचरणात येत नाहीत, तोपर्यंत आपले डोके सुपीक होणार नाही आणि खऱ्या अर्थाने समाजाचे परिवर्तन घडणार नाही, असे परखड मत प्रसिद्ध व्याख्याते प्रा. बापुसाहेब शिंदे यांनी व्यक्त केले.तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने गुरुवार, दि. १९ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त 'तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात' भव्य व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, इंजि. रविंद्र कोलप तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य प्रा.डी.जी. निकाळजे, डॉ. अश्विनी बेद्रे, डॉ. विजयकुमार बांदल, प्रा. डी.डी. राऊत, प्रा. प्रकाश ढोकणे आणि आयु. उमा जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.महापुरुषांच्या कार्याची सांगड घालताना प्रा. शिंदे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यात एक 'गुरु-शिष्य' नाते होते. शिवरायांनी स्त्रियांना समाजात सन्मान मिळवून दिला, महात्मा फुलेंनी त्यांना शिक्षण दिले, तर डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून कायद्याचे अधिकार प्राप्त करून दिले. या तिन्ही महापुरुषांच्या विचारांचा संदेश आपल्या दैनंदिन जीवनात उतरवणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे.पुढे राजमाता जिजाऊंच्या योगदानाबद्दल बोलताना प्रा. शिंदे म्हणाले की, पावणे चारशे वर्षांपूर्वी जेव्हा देशात मुघलशाही,



आदिलशाही आणि निजामशाहीचे वर्चस्व होते, अशा कठीण परिस्थितीत राजमाता जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न पाहिले. जोपर्यंत महिला आत्मनिर्भर होत नाहीत, तोपर्यंत त्यांना समाजात सन्मान मिळणार नाही, हा जिजाऊंचा विचार आजही तितकाच महत्त्वाचा आहे. प्रत्येक स्त्रीला स्वावलंबी करणे हेच या महामातांचे ध्येय होते, असे स्पष्ट केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य प्रा. डी.जी. निकाळजे यांनी संस्थेच्या ध्येयधोरणांवर प्रकाश टाकत म्हटले की, महापुरुषांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन सक्षम पिढी निर्माण करणे हे संस्थेचे मुख्य उद्देश आहे. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रदीप रोडे म्हणाले की, जर तुम्हाला तुमच्या स्वप्नांना वास्तवात बदलायचे असेल, तर महान व्यक्तींच्या जीवनकथांचा अभ्यास करा. त्यातून प्रेरणा आणि ऊर्जा मिळेल, आणि तुमच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग स्पष्ट होईल.जसे छत्रपती शिवाजी महाराज यांनी धैर्य आणि रणनीतीने शत्रूंचा पराभव केला, तसे तुम्हालाही चिकाटीने तुमचे उद्दिष्ट साध्य करता येईल, असे सांगितले. यावेळी महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला पुस्तके भेट देऊन नवा आदर्श निर्माण केला. यानंतर शिवजयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.योगिता लांडगे व विद्यार्थ्यांनी केले. तर आभार प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल यांनी मानले. यावेळी तुलसी समूहातील प्राध्यापक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पात्रुडमध्ये रांगोळीच्या माध्यमातून अवतरले शिवराय रंजना आणि सुरेखा यादव यांची अनोखी मानवंदना

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील पात्रुड येथे शिवजयंतीचा उत्साह ओसंडून वाहत असतानाच, रंजना यादव आणि सुरेखा यादव या तरुणींनी आपल्या कलेच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांना आगळीवेगळी मानवंदना दिली आहे. अत्यंत आकर्षक आणि जिवंत वाटणारी महाराजांची प्रतिकृती त्यांनी रांगोळीच्या माध्यमातून साकारली असून, परिसरातील नागरिकांकडून या दोघींच्या कलेचे मोठे कौतुक होत आहे.




अंजली किराणा आणि जनरल स्टोअर्सच्या समोर साकारण्यात आलेली ही भव्य रांगोळी पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. शिवजयंतीच्या निमित्ताने केवळ मिरवणुकांवर भर न देता, अशा प्रकारे सर्जनशील पद्धतीने महाराजांचा आदर व्यक्त करण्याचा या तरुणींचा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.अत्यंत सूक्ष्म बारकाव्यांसह रेखाटलेली ही कलाकृती पात्रुड गावातील मुख्य आकर्षणाचे केंद्र ठरली आहे. यादव भगिनींच्या या उपक्रमाचे संपूर्ण माजलगाव तालुक्यात कौतुक होत असून, सोशल मीडियावरही या रांगोळीचे फोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत.

# शिवछत्रपती सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महाप्रसादाचे वाटप

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

शिवछत्रपती सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त महाप्रसाद वाटप करण्यात आला. यावेळी उपस्थित माजी बहीरवाडी सरपंच आसाराम गायकवाड यावेळी उपस्थित शिवसेना एकनाथ शिंदे गट उपजिल्हाप्रमुख आमोल जाधव, भगवाधारी प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष कृष्णा जाधव, माजी नगरसेवक संतोष गायकवाड, महाराष्ट्र राज्य ट्रायबल कम्युनिटीज् वेल्फेअर असोसिएशन राज्य अध्यक्ष अँड नामदेव जाधव सर, रिपब्लिकन पक्षाचे भटके विमुक्त आघाडी



बीड जिल्हाध्यक्ष संभाजी गायकवाड,यांच्या हस्ते महाराजांच्या मुर्तीची पुजा करुन महाप्रसाद वाटप करण्यात आला. आयोजक शिवछत्रपती सामाजिक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा परमीट मालक चालक ऑटो रिक्षा संघटना जिल्हाध्यक्ष भागवत गायकवाड, व रिक्षा संघटना सदस्य विठ्ठल राऊत, राहूल घोलप, नागेश पवार, अशोक कांबळे, बाळू सपकाळ रोहित काळे, अशोक गायकवाड, रवी वाघमारे, सुदर्शन कानडे, शुभम गोरे, यांनी सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले.

# ९ महिन्यांपूर्वी गहाळ झालेली दोन चाकी गाडी माजलगाव शहर पोलीसांनी शोध घेवुन मुळ मालकाला केली सुपुर्त

## गाडी मालकाने मानले पी.आय.सूर्यतळ यांचे आभार

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन माजलगाव शहर हद्दीत मागील सहा महिन्यांपूर्वी शिवाजी महाराज चौक बस स्थानका समोर दृष्टी ऑप्टिकल समोरुन सि.बी शाईन नावाची मोटर सायकल महा २३ ए एम ७७१० दि.०८ मे २०२५ रोजी रात्री १२:४५ वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली होती. ऑप्टिकल मधिल कामगार मुलगा बाहेर गावाहून रात्री उशिरा माजलगाव शहरांमध्ये परतल्यामुळे मुक्कामा साठी दृष्टी ऑप्टिकल समोर मोटर सायकल लाऊन तो ऑप्टिकल मध्ये झोपायला गेला असता रात्री १२:४५ च्या सुमारास बिना नंबर ची चार चाकी गाडी मधुन येऊन शिवाजी महाराज चौक बाजार रोड येथे गाडी उभी केली आणी चार चाकी गाडी मधुन दोन चोरटे आरोपी



उतरले दृष्टी ऑप्टिकल समोर उभी असलेली सि.बी शाईन मोटर सायकल चे हँडल लॉक टोडले आणि गाडी डायरेक्ट करुन लंपास केल्याची घटना घडली होती.त्या वरुन सदर मोटर सायकल गहाळ झाल्याची तक्रारी पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे दाखल झाली होती. तसेच आज कालच्या धावपळीच्या युगामध्ये मोटर सायकल हि जिवणामधे आवश्यक झाली आहे. त्यामुळे मोटर सायकल ही प्रत्यकासाठी महत्वाची आणि गरजेचा विषय ठरलेली आहे. त्यामुळे सदर गहाळ झालेली मोटर सायकल शोध कामी पो.स्टे. स्तरावर विशेष पथकाची नेमणुक करुन मोटर सायकल चा शोध घेवुन संबंधित तक्रारदार व वाहन मालक डॉ.गणेश मस्के यांना गाडी सुपुर्त करुन चावी देतांना माजलगाव शहर पोलिस स्टेशन चे पोलिस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/रामेश्वर खेत्रे, पत्रकार अजिंक्य वाघमारे उपस्थित होते. काल दि.१९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी माजलगाव शहर पोलिस स्टेशन येथे वाहन मालकाला मोटर सायकल परत केली असुन त्या बाबत डॉ.गणेश मस्के यांनी माजलगाव शहर पोलीसांचे आभार व्यक्त करुन समाधान व्यक्त केले आहे.सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.नवनित क़ॉवत, मा.अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके, उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोह/१७९६ रामेश्वर खेत्रे, यांनी केलेली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चौक बालाजी झेंडा लाईन गल्ली परिसरा मध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही देगलूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक बालाजी झेंडा लाईन गल्ली परिसरामध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरा करण्यात आली यावेळी शिवरायांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.. या कार्यक्रमाला आमदार जितेश भाऊ अंतापुरकर, माधवराव मिसाळे गुरुजी, शिवाजीराव देशमुख बळेगावकर, व्यंकटेश पबीतवार, जनार्दन बिरादार, सुरेश मिसाळे, प्रशांत लच्छिराम दासरवार, माधव पाटील पाळेकर, गंगाधर दाऊलवार, मुकुंद भुताळे, सुरेश नक्कावार, संजीव पांचाळ, अशोक घाटे, सौरव मधुरवार, अमित बोनलावार, उमाकांत भूताळे, मयूर महाजन, नवनाथ पाटील नागराळकर, घाळप्पा अंबेसंगे, बालाजी ढगे, बस्वराज पंचडे, ओमप्रकाश हंगरगेकर,दत्तात्रय कळसकर, श्रीकांत गरुडकर, नरहरी कोलगणे, बालाजी अडेपवार, हरीश अग्रवाल, अवधूत राजकुंटवार, राजकुमार पाटील, धनाजी जोशी, सचिन कांबळे,राहुल श्रीरामवार, सुदर्शन पूलगमवार, नरेश बेजगमवार, संतोष पांचाळ, रमेश गंदपवार, दत्ता टाकळे, श्रीकांत भिलोंडे, प्रदीप सक्करगे पाटील, सुनील मनसक्कर्गे, सौरव हिंगोले आदी उपस्थित होते.

# ध्यानधारणेमुळे विश्वशांती शक्य-योगतज्ञ डॉ.राधा तांबे रोटरीतर्फे शिवजयंती साजरी

**गेवराई । प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ गेवराईच्या वतीने आर बी अट्टल महाविद्यालयात पतंजली योग समिती,रोटरी क्लब व आर बी अट्टल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शांतता मास व शिवजयंतीनिमित्त आयोजित सात दिवसीय आनंदी जीवनाची गुरुकिल्ली योगा,प्राणायाम, ध्यानधारणा शिबिराचा प्रारंभ १९ फेब्रुवारी सकाळी ६ वाजता प्रसिद्ध योगतज्ञ,आंतरराष्ट्रीय योगपटू डॉ.राधा सचिन तांबे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.यावेळी डॉ.तांबे यांनी विविध योगा आसने,शारीरिक व्यायाम व शांततेसाठी ध्यानधारणा याबाबत मार्गदर्शन केले.त्यांच्या समवेत क्रीडातज्ञ उद्धव लाड हे उपस्थित होते.आर बी अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रो.डॉ.रजनी शिखरे यांच्या सहकार्याने योगा सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त महाराजांच्या प्रतिमेचे तसेच पतंजली ऋषी व रोटरीचे संस्थापक अध्यक्ष पॉल हॅरिश यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.उपस्थित मान्यवरांचे स्वागत पतंजली योग समिती व रोटरी क्लबच्या सदस्यांनी केले.तब्बल सव्वादोन तास डॉ तांबे यांनी प्रात्यक्षिकासह आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. रोटरी इंटरनॅशनलने सूचित केल्यानुसार फेब्रुवारी महिना शांतता मास मानला जातो.त्यानिमित रोटरी क्लब आणि गेवराईच्या वतीने विश्वशांतीसाठी सर्वांनी एक तास ध्यान दान केले आणि जगात शांतता नांदवी, सर्वांचे कल्याण व्हावे, प्राणीमात्रात सद्भाव निर्माण व्हावा, सुख, शांती, प्रेम, आनंद नांदावा या साठी सामूहिक प्रार्थना करण्यात आली. आपल्या मार्गदर्शनात संबोधन करताना डॉ .राधा तांबे म्हणाल्या की ,शांतता ही सदचार, ध्यान, शुभचिंतन केल्याने प्राप्त केली जाऊ शकते. आज चोहीकडे अशांतता दिसून येते,



प्रत्येकजनाला शांतता हवी आहे, पण ती कशी मिळेल हे ठाऊक नाही.जगात चोहीकडे मानसिक रोग्यांचे प्रमाण वाढत चालले आहे.त्यावर एकच इलाज असू शकतो त म्हणजे आपल्या मनाला स्थिर ठेवणे .हे ध्यानानेच शक्य आहे. सर्व उपस्थितांना त्यांनी ऑनलाइन मेडिटेशन चा कोर्स करण्याचा सल्लाही त्यांनी दिला. राष्ट्रीय योगपटू सचिन मोहिते व बाल योगपटू जय सिद्देवाड यांनी अत्यंत कठिण योगासने सहजरित्या करून दाखविली.उपस्थित योगसाधकांनीसुध्दा टाळ्या वाजवून कौतुक केले.शेवटी शांतिपाठ व हास्यासन घेऊन प्रथम दिनाच्या योग शिबिराची सांगता झाली.हे शिबीर सलग सात दिवस सुरू राहणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र बरकसे, सचिव प्रविण जैन, संचालक राजेंद्र डेंगे,डॉ.जगदीश पोतदार,राधाकिसन लड्डा,प्रोजेक्ट चेयरमैन प्रा.आर डी मुंडे,धर्मराज करपे,उत्तम सोलाने ,आर बी अट्टल महाविद्यालयाचे प्रा.डॉ.रविंद्र खरात,गौतम बोरुडे यांच्यासह पतंजली योग समितीचे सदस्य ,शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकिजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077